श्री.खेडकर भगवान भिवसेन,ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत-अकोले,ता.पाथर्डी यांना पदावरुन तात्पुरते दूर करणेबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
ग्रामपंचायत विभाग
आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/२२८/२०२६
दिनांक -१०/०६/२०२६

संदर्भ :- १.गटविकास अधिकारी पंचायत समिती पाथर्डी यांचेकडील पत्र क्र.आस्था-२/३९४/ २०२६,दिनांक १०/०६/२०२६
२.महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ चा नियम ३
३.महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम क्र.३

ज्याअर्थी श्री.खेडकर भगवान भिवसेन, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत-अकोले,ता.पाथर्डी यांना माहितीच्या अधिकारात हालचाल रजिस्टर नोंदीची छायांकित प्रत मागणी करण्यात आली होती. अर्जानुसार माहिती मागितलेल्या नागरिकास श्री खेडकर भगवान भिवसेन, ग्रामपंचायत अधिकारी यांनी अकोले ग्रामपंचायत कार्यालयात मारहाण केल्याचे व्हिडीओ समाज माध्यमाद्वारे तसेच वृत्त वाहिन्यावर प्रसिध्द झाले आहे. जिल्हा परिषद कर्मचा-याने सदैव निरपवाद, सचोटीने वागणे व कर्तव्यपरायण असणे आवश्यक आहे. तथापि श्री खेडकर भगवान भिवसेन, ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत अकोले,ता.पाथर्डी यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत आहे.

त्याअर्थी महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम क्र.३ मधील (१)(अ) मध्ये दिलेल्या तरतूदीस अधीन राहून मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी मुख्य कार्यकारी अधिकारी तथा शिस्तविषयक प्राधिकारण जिल्हा परिषद अहिल्यानगर या आदेशाव्दारे श्री.खेडकर भगवान भिवसेन, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत-अकोले,ता.पाथर्डी यांचे विरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही प्रस्तावित असल्याने यांना सदर आदेशाच्या दिनांकापासून जिल्हा परिषद सेवेतून ग्रामपंचायत अधिकारी या पदावरुन सेवानिलंबीत करीत आहे.

आणखी, असाही आदेश देण्यात येत आहे की, हा आदेश अंमलात राहील तेवढया कालावधीत श्री.खेडकर भगवान भिवसेन, ग्रामपंचायत अधिकारी यांचे मुख्यालय पंचायत समिती -अहिल्यानगर- येथे राहिल आणि श्री.खेडकर भगवान भिवसेन, ग्रामपंचायत अधिकारी यांना सेवानिलंबन कालावधीत देण्यात आलेल्या मुख्यालयातील तालुक्याचे गटविकास अधिकारी पंचायत समिती यांच्या पूर्व परवानगी शिवाय मुख्यालय सोडता येणार नाही.

श्री.खेडकर भगवान भिवसेन, ग्रामपंचायत अधिकारी यांना महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन,बडतर्फी व सेवेतुन काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ६८ च्या तरतूदी नुसार निलंबन भत्ता व पुरक भत्ते देण्यात यावेत. निलंबनाच्या कालावधीत श्री.खेडकर भगवान भिवसेन, ग्रामपंचायत अधिकारी यांनी खाजगी नोकरी स्विकारु नये. त्यांनी तसे केल्यास त्या बाबतचे पुरवणी दोषारोप त्यांचेवर ठेवण्यात येतील. तसेच ते निलंबन निर्वाह भत्ता गमविण्यास पात्र ठरतील.

निलंबनाच्या कालावधीत, श्री.खेडकर भगवान भिवसेन, ग्रामपंचायत अधिकारी यांना निलंबन निर्वाह भत्ता जेंव्हा जेव्हा देण्यात येईल त्या त्या वेळी आपण खाजगी नोकरी स्विकारली नाही अथवा कोणताही खाजगी धंदा व व्यवसाय करीत नाही, अशा आशयाचे प्रमाणपत्र श्री.खेडकर भगवान भिवसेन, ग्रामपंचायत अधिकारी,

ग्रामपंचायत-अकोले,ता.पाथर्डी यांनी त्यांना सेवानिलंबीत करुन दिलेल्या मुख्यालयाचे तालुक्याचे गटविकास अधिकारी पंचायत समिती यांना सादर करावे.

निलंबनाचे कालावधीत श्री.खेडकर भगवान भिवसेन, ग्रामपंचायत अधिकारी यांना निलंबन निर्वाह भत्ता देण्याबाबतची कार्यवाही सेवानिलंबीत करुन देण्यात आलेलया मुख्यालयाचे गटविकास अधिकारी पंचायत समिती अहिल्यानगर हे करतील.

या आदेशाची नोंद श्री.खेडकर भगवान भिवसेन, ग्रामपंचायत अधिकारी यांच्या मूळ सेवापुस्तकामध्ये घेण्यात यावी. सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक २०२६०६१००६००८३ असा आहे.

आनंद भंडारी, (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री.खेडकर भगवान भिवसेन, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत-अकोले,ता.पाथर्डी

व्दारा व प्रत:- गटविकास अधिकारी पंचायत समिती पाथर्डी.

प्रत- गटविकास अधिकारी पंचायत समिती पाथर्डी,जि.अहिल्यानगर.

२/-सदर सेवा निलंबन आदेश श्री.खेडकर भगवान भिवसेन, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत-अकोले, ता.पाथर्डी यांना तात्काळ बजावून दिनांकीत स्वाक्षरी घेण्यात यावी व सदरची प्रत उलट टपाली या कार्यालयास विना विलंब सादर करावी.

प्रत- गटविकास अधिकारी पंचायत समिती अहिल्यानगर-- जि.अहिल्यानगर

प्रत- निवड नस्ती